Telephone : 02472-223944
E-mail :
dahoosmanabad@gmail.com
dahoosmanabad-mh@gov.in

जिल्हा परिषद उस्मानाबाद
पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद उस्मानाबाद.४१३५०१
Animal Husbandry Department Z.P.Osmanabad 413501

## श्वानदंश लस खरेदी दर पत्रकाच्या अटी व शर्ती

पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद, उस्मानाबाद कार्यालयामार्फत उस्मानाबाद जिल्हयातील ९४ संस्था (८ तालुके) जि.प.सेस योजना सन २०१९-२०२० अंतर्गत १०० टक्के अनुदानावर श्वानदंश लस पुरवठा करणेसाठी पुरवठा धारकाकडुन खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन दरपत्रके मागविण्यात येत आहे.

१. सदरील योजने अंतर्गत श्वानदंश लस खरेदी रुपये १.०० लक्ष मर्यादेत राहील.
२. प्रत्येक निविदाकारास फक्त एकच दरपत्रक सादर करण्याची परवानगी असेल.
३. निविदाकाराने GST नोंदणी क्रमांक व पॅनकार्ड सादर करणे बंधनकारक राहील
४. खरेदी प्राधिकाऱ्याबरोबर हितसंबंधाचा संघर्ष नसल्याबाबत आणि इच्छूक संस्थेने एकल निविदा देण्याबाबत निविदाकाराने हमी देणे बंधनकारक राहील..
५. श्वानदंश लस खरेदी दरपत्रकाच्या अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे बंधपत्रक पुरवठाधारकांने स्वाक्षरी करुन सादर करावे, त्यावर संस्थेचा पत्ता पिनकोड नंबरसह, फोन नंबर, मोबाईल नंबर नमुद करण्यात यावा.
६. श्वानदंश लसीचा दर प्रती मात्रा रुपयात नमुद करुन स्वाक्षरीसह सिलबंद पाकिटात सादर करावे.
७. निविदाकार पुरवठादाराने आपले दरपत्रक सिलबंद पाकीटात दिनांक 19 / 11 /२०१९ ते 26 11/२०१९ या कालावधीत कार्यालयीन वेळेत जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचे कार्यालयात सादर करणे बंधनकारक राहील.
८. प्राप्त दरपत्रके दिनांक 28 / 11 /२०१९ रोजी दुपारी ४.०० वाजता उघडण्यात येतील.
९. श्वानदंश लसीचे दर दिनांक 19 / 11 /२०१९ ते 30 / 03 /२०२० या कालावधीसाठी राहतील एकदा मंजुर केलेले दरपत्रक / दरामध्ये पुन्हा कोणत्याही कारणास्तव बदल करण्यात येणार नाही.
१०. पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद उस्मानाबाद या संस्थेच्या मागणीप्रमाणे पुरवठा आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसात पुरवठा करणे, पुरवठाधारकांवर बंधनकारक राहील.
११. कोणतेही दरपत्रक स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा किंवा सर्वच दरपत्रके नाकारण्याचा हक्क दरपत्रक उघडणेसाठी नेमलेल्या खरेदी समितीस राहील.

सदस्य सचिव
जिल्हा स्तरिय खरेदी समिती, पशुसंर्धन विभाग
तथा जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
जिल्हा परिषद, उस्मानाबाद

अध्यक्ष
जिल्हा स्तरिय खरेदी समिती, पशुसंर्धन विभाग
तथा अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, उस्मानाबाद